# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.11.2025** **वारःसोमवार**

---

1. विश्वविजेतेपद मिळवत भारतीय महिला क्रिकेट संघाची अभिमानास्पद कामगिरी
2. सीएमएस 03 या आतापर्यंतच्या सर्वात जास्त वजनाच्या उपग्रहाचं काल इस्त्रोकडून यशस्वी प्रक्षेपण
3. उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष परिषदेचं उद्घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आणि
4. बिहारमध्ये पहिल्या टप्प्यातील निवडणुकीसाठीचा प्रचार शिगेला

विनिंग मोमेंट म्युझिक

**<u>क्रिकेट</u>**

50 षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या आयसीसी विश्वकरंडक स्पर्धेचं पहिलंच विजेतेपद मिळवणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघावर सर्वच स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरुन या विश्वविजेत्या संघाच्या अभिमानास्पद कामगिरीचं कौतुक केलं आहे. काल झालेल्या अंतिम सामन्यात भारतानं मिळवलेल्या रोमहर्षक विजयाबाबत आमचे प्रतिनिधी प्रशांत जाधव यांचा हा वृत्तांत....

**पावसामुळे सामना दोन तास उशिरा सुरू झाला तरी भारतीय संघाने अत्यंत चिकाटीने आणि धीरोदात्त खेळ करत मुंबईतील डी वाय पाटील मैदानावर दक्षिण आफ्रिका संघाचा 52 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी शतकी भागीदारी केली. शफाली वर्मा आणि दीप्ती शर्मा यांच्या अर्धशतकांच्या जोरावर भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी 299 धावांचे आव्हान ठेवले. आफ्रिकेकडून कर्णधार लॉरा वुलव्हार्ड हिने शतक ठोकत चांगला प्रतिकार केला परंतु दीप्ती शर्माने तिला बाद करून मोठा अडथळा दूर केला. दक्षिण आफ्रिका संघ 246 धावा करू शकला. दीप्ती शर्माने सर्वाधिक 5 बळी घेतले. शिवाय तिने 58 चेंडूत 58 धावांचे योगदान दिले. तिला मालिकावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर शफाली वर्मा हिला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आय सी सी महिला क्रिकेट विश्वचषक पहिल्यांदा अमोल मुझुमदार या मराठमोळ्या प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली उंचावून भारतीय संघाने जबरदस्त ऐतिहासिक कामगिरी केली आहे. अशी कामगिरी करणारा भारत हा चौथा संघ ठरला आहे. यापूर्वी ऑस्ट्रेलिया, इंग्लड आणि न्यूझीलंड या संघांनी ही कामगिरी केली होती. 25 वर्षानंतर भारतीय संघाला ही स्वप्न पूर्ती साध्य करता आली आहे. या विजयाने आज प्रत्येक भारतीयाचा ऊर अभिमानाने आणि आनंदाने भरून आला आहे.**

**इस्रो**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोनं सीएमएस 03 या आतापर्यंतच्या सर्वात जास्त वजनाच्या उपग्रहाचं काल यशस्वी प्रक्षेपण केलं. भारतीय नौदलासाठी प्रक्षेपित केलेल्या या अत्याधुनिक दूरसंवाद उपग्रहामुळे नौदलाच्या अवकाश आधारित संवाद प्रणालीचं आणि सागरी क्षेत्रातील सतर्कतेबाबतचं सामर्थ्य आणखी बळकट होईल. देशभरात तसंच आसपासच्या समुद्री क्षेत्रात दूरसंवादाचं सुरक्षित, बहुस्तरीय माध्यम यामुळे उपलब्ध झालं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रिय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांच्यासह इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही नारायणन यांनी या यशाबद्दल इस्रोचं अभिनंदन केलं आहे. इस्रो सातत्यानं नवनवी यशाची शिखरं गाठत आहे असं डॉ. जितेंद्र सिंग यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**पंतप्रधान एस्टिक**

उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष परिषदेचं उद्घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. तीन दिवसांच्या या परिषदेत शिक्षण संस्था, संशोधन संस्था, उद्योग जगत, सरकारी यंत्रणा यांच्या प्रतिनिधींसह नोबेल पुरस्कार विजेते, नामवंत शास्त्रज्ञ, नवोन्मेषक आणि धोरणकर्ते सहभागी होणार आहेत. आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धीमत्ता, जैव उत्पादन, नील अर्थव्यवस्था, इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर उत्पादन, कृषी तंत्रज्ञान, उर्जा, पर्यावरण आणि हवामान बदल, आरोग्य तंत्रज्ञान, क्वांटम विज्ञान आणि अवकाश तंत्रज्ञान इत्यादी प्रमुख क्षेत्रातील नवोन्मेषाबाबत या परिषदेत विचारविनिमय केला जाईल.

नवी दिल्लीत भारत मंडपम इथं होणाऱ्या या परिषदेत पंतप्रधानांच्या हस्ते 1 लाख कोटी रुपयांच्या संशोधन विकास आणि नवोन्मेष योजना निधीचंही वितरण केलं जाणार आहे. देशातल्या खाजगी क्षेत्रातील संशोधन आणि विकास परिसंस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

**हयात प्रमाणपत्र**

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या देशव्यापी डिजिटल हयात प्रमाणपत्र मोहीमेअंतर्गत नवी दिल्लीत आयोजित केलेल्या महाशिबिरात आज विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग सहभागी होणार आहेत. दोन हजारांपेक्षा जास्त शहरांमधल्या दोन कोटी निवृत्ती वेतनधारकांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशानं ही मोहीम सुरू करण्यात आल्याची माहिती कार्मिक, तक्रार निवारण आणि निवृत्ती वेतन मंत्रालयानं दिली आहे.

**बिहार प्रचार**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचारासाठी दोन दिवसांचाच अवधी असल्यामुळे तिथं प्रचार शिगेला पोहोचला आहे. विरोधकांची महाआघाडी आणि सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नेत्यांच्या जाहीर सभांचा धडाका सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रिय मंत्री अमित शहा, मुख्यमंत्री नितीश कुमार तसंच काँग्रेस नेते राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी काल विविध ठिकाणी प्रचार सभा घेतल्या. आजही या नेत्यांसह तेजस्वी यादव, प्रियांका गांधी यांच्या सभा होणार आहेत. तसंच निवडणूक रिंगणातले उमेदवार मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेण्यावरही भर देत आहेत.

**अफगाणिस्तान**

भारतानं अफगाणिस्तानला मलेरिया, डेंग्यू आणि लेशमॅनियासिस या विषाणूजन्य रोगांवरची 16 टनांपेक्षा जास्त वजनाची औषधं आणि रोगनिदान उपकरणं पाठवली आहेत. अफगाणिस्तानच्या मलेरिया आणि अन्य विषाणूजन्य रोग प्रतिबंध अभियानाला यामुळे पाठबळ मिळेल असं तालिबानचे प्रवक्ते शराफत झमान यांनी म्हटलं आहे. भारताचा अफगाणिस्तानच्या विकासाला असलेला पाठिंबा आणि दीर्घकालिन भागीदारी यामुळे अधोरेखित झाल्याचं त्यांनी नमूद केलं.

**रशिया**

रशियानं आपल्या खाब्रोवस्क या अण्वस्त्रधारी पाणबुडीचं जलावतरण केलं आहे. पोझेडॉन किंवा डूमस्डे क्षेपणास्त्र हे आण्विक ड्रोन जल पृष्ठभागाखालून वाहून नेण्याच्या दृष्टीनं या अत्यंत घातक पाणबुडीची रचना करण्यात आली आहे. रशियन नौदलासाठी हे खूप महत्त्वाचं यश असल्याचं रशियाचे संरक्षणमंत्री आंद्रेई बेलोसोव्ह यांनी म्हटलं आहे.

**त्रिशूल सराव**

भारतीय नौदलाच्या नेतृत्वात तिनही सेनादलांच्या संयुक्त सरावाला सुरुवात झाली आहे. त्रिशूल असे नाव देण्यात आलेला हा सराव गुजरातच्या किनारपट्टीवर आणि राजस्थानच्या वाळवंटात 13 नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. तिनही सेनादलांच्या कार्यपद्धतीमधलं प्रमाणीकरण निश्चित करणं आणि समन्वय साधणं यासाठी हा सराव आयोजित केला आहे. या सरावाद्वारे गुप्तहेर यंत्रणा, दक्षता यंत्रणा आणि सायबर युद्ध, इलेक्ट्रॉनिक युद्ध आणि टेहळणी याबाबतची कार्यपद्धतीदेखील प्रमाणित केली जाणार असल्याचं संरक्षण मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**अपघात**

राजस्थानमध्ये, फलोदी जिल्ह्यात काल झालेल्या रस्ते अपघातात 15 पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला. जोधपूरमधून यात्रेकरूंना घेऊन निघालेली बस, एका थांबलेल्या ट्रकला धडकल्यानं हा अपघात झाला. जखमींवर नजीकच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा यांनी या घटनेवर दु:ख व्यक्त केलं असून, जखमींच्या योग्य उपचाराची दक्षता घेण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या वारसांना दोन लाख तर जखमींना 50 हजार रुपयांच्या मदतीची घोषणा केली आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.